# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दि. १२/०१/२०१७

## नक्षलवादयांकडून नक्षल समर्थकांसह निष्पाप नागरिकाची हत्या

गडचिरोली जिल्हयात शासनांकडून होत असलेली वेगवेगळी विकास कामे यामुळे आदिवासी लोकांमध्ये शासकिय यंत्रणेविषयी वाढता विश्वास व दिनांक ०६/०१/२०१७ रोजी पोलीस नक्षल चकमकीत महिला नक्षल कमांडर ज्योती गावडे (सुरजागड एलओएस) हिला पोलीसांनी कंठस्नान घातले. यामुळे बिथरलेल्या नक्षलवादयांना आपली दहशत व वर्चस्व कमी होत असल्याची भिती वाटू लागल्याने नक्षलवादी विकास कामांना बंद पाडून सुशिक्षीत आदिवासी तरूणांना लक्ष करुन त्यांना जीवे ठार मारुन आपली दहशत व  वर्चस्व दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

नक्षल चळवळीचा गडचिरोली जिल्हयातील प्रभाव कमी होत असल्याने नक्षलवादी लहानसहान गावातील सुशिक्षीत बेरोजगार तरुणांना नक्षल चळवळीकडे आकर्षित करीत आहेत. जे युवक नक्षल चळवळीत नक्षल समर्थक एआरडी- जीआरडी म्हणून काम करीत होते त्यांना पुर्ण वेळ नक्षल चळवळीत

काम करण्यासाठी नक्षलवादयांकडून प्रवृत्त केले जात आहे. परंतू ज्यांनी यास विरोध केला अशा नक्षल समर्थकांना एआरडी- जीआरडी सदस्यांना नक्षलवादी जीवे ठार मारीत आहेत. व मारलेली व्यक्ती ही पोलीसांचा खबऱ्या असल्याने आम्ही त्यास मारले असे जनतेला सांगत आहेत. अशीच घटना काल पेंढरी उपविभागात घडली.

नक्षलवादयाकडून काल पुन्हा १) रमेश आतला वय- २७ वर्ष, २) मनोहर आतला वय- ५५ वर्ष, दोन्ही रा. चिचोडा यांची रात्रो ०२.०० वा. त्यांचे राहते गावात गोळया घालून हत्या करण्यात आली आहे. हे दोन्ही इसम आपले राहते गावी स्वतःचा शेती हा पारंपारीक व्यवसाय करीत होते याचबरोबर गावाच्या परीसरात नक्षलवादी आल्यास त्यांना जेवण देणे व गावाच्या आजुबाजूला नक्षलवादयांसोबरत फिरणे ही कामे नक्षलवादयांसाठी करीत होते. मागील कालावधीमध्ये अशाचप्रकारे ०४ निष्पाप युवकांची नक्षलवादयांकडून हत्या करण्यात आलेली असून यामधून नक्षलवादयांच्या खचलेल्या मानसिकतेच्या चेहरा दिसून येत आहे. जनतेमधून या घटनांचा प्रचंड विरोध केला जात आहे.

सदर घटना घडलेल्या परीसरात पोलीसांनी नक्षल विरोधी अभियान अधिक तीव्र केले असून याबाबत नक्षलवादयांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.